सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)
कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**संदर्भ : रासेयो/२०२४–२५/३६१** **दि. ०२/१२/२०२३**

**प्रति,**
**मा. प्राचार्य व रासेयो कार्यक्रम अधिकारी**
**रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा**

**विषय : विशेष शिबिर नियोजन बैठकीबाबत व** Online **प्रस्ताव भरणेबाबत**

महोदय/महोदया,

दरवर्षी राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत प्रत्येक रासेयो महाविद्याल दत्तक गाव योजना राबवते आणि ह्याअंतर्गत या गावात ७ दिवसीय विशेष शिबिर घेतले जाते. शैक्षणिक वर्ष २०२४–२५ वर्षाकरिता मा. राज्यसंपर्क अधिकारी कार्यालय यांनी पाठवलेल्या पत्रानुसार **'Youth for My Bharat'** व **'Youth for Digital Literacy' या विषयावर आधारीत** विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात यावे. महाविद्यालयांनी **My Bharat** पोर्टलवर रजीस्ट्रेशन करून **My Bharat** पोर्टलवर **Activity Event** तयार करून **Upload** करावेत. बॅनर, टीशर्ट, कार्यक्रम पत्रिकेवर सदर थीमचा उल्लेख करावा. विशेषतः महाविद्यालय आयोजित विशेष शिबिरांस, राष्ट्र/राज्य व विद्यापीठस्तरावरील वरिष्ठ अधिकारी, जिल्हा/विभाग समन्वयक अनपेक्षितपणे भेट देणार आहेत. सबब ग्रामीण शिबिरांचे नियोजन सकारात्मक व परिणामकारक करावे.

त्या अनुषंगाने महाविद्यालयाने एक गाव दत्तक घेवून दत्तक गावाच्या विकासकामांबाबत आढावा घेऊन विद्यापीठाने ठरवून दिलेले उपक्रम आयोजित करावयाचे आहेत. महाविद्यालयांमधील राष्ट्रीय सेवा योजना एककांनी या वर्षीचा विषयनिहाय विद्यार्थी सहभाग, विशेष शिबिराचे आयोजन अत्यंत नेटके, सर्वव्यापी आणि अधिक परिणामकारक करणे अधिक महत्त्वाचे मानले आहे, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

यावर्षी प्रत्येक रासेयो एककाने हे ७ दिवशीय विशेष शिबिर **३१ जानेवारी २०२५** पर्यंत आयोजित करणे आवश्यक आहे. विशेष शिबिरासाठीचे प्रत्येक रासेयो एककाकडून प्रस्ताव मागवण्यात येत आहेत. हे प्रस्ताव Online पद्धतीने मागवण्यात येत असून **दि. १० डिसेंबर, २०२४** पर्यंत राष्ट्रीय सेवा योजना एककांनी Online प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. ह्यासाठी www.unipune.ac.in/bcud/login/nss/special camp proposal लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. **दि. १० डिसेंबर २०२४** नंतर शिबिर प्रस्ताव Online लिंक उपलब्ध करून देण्यात येणार नाही. तरी निर्धारीत कालावधीमध्ये प्रस्ताव भरण्यात यावे.

 *मागे पहा...*

त्या पार्श्वभूमीवर विशेष शिबिर नियोजन बैठकींचे आयोजन पुढीलप्रमाणे जिल्हानिहाय पद्धतीने करण्यात आले आहे. नियोजन बैठकीसमयी आपल्या महाविद्यालयातील एक रासेयो कार्यक्रम अधिकारी निवड केलेल्या गावाची माहिती सोबत घेऊन उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यांमधील रासेयो जिल्हा व विभाग समन्वयक यांनी अनिवार्यपणे उपस्थित राहणे आवश्यक आहे.

| क्र | सभेचे ठिकाण | विभाग | दिनांक | संपर्क अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | संत ज्ञानेश्वर सभागृह,<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | पुणे जिल्हा (शहर व ग्रामीण) | १० डिसेंबर, २०२४,<br>स. १०.३० वाजता : नावनोंदणी<br>स. ११.०० वाजता : नियोजन बैठक | रासेयो कार्यालय विद्यापीठ<br>०२०–५६२२६८८,८९,९०,९१ |
| २ | मराठा विद्या प्रसारक समाजाचे के.टी.एच.एम. महाविद्यालय, शिवाजी नगर, गंगापूर रोड, नाशिक | नाशिक जिल्हा | ११ डिसेंबर, २०२४,<br>स. ९.०० वाजता : नावनोंदणी<br>स. १०.०० वाजता : नियोजन बैठक | डॉ. गोरक्षनाथ पिंगळे, ९९७०३०८२९०<br>डॉ. डि. के. आहेर, ९४२११२५७२०५<br>डॉ. रविंद्र आहिरे, ९७६५२१९४२२ |
| ३ | शिक्षण प्रसारक संस्थेचे संगमनेर न.पा. आर्ट्स, डी.जे. मालपाणी कॉमर्स अँड बी. एन. सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर | अहिल्यानगर जिल्हा | ११ डिसेंबर, २०२४,<br>दु. १.०० वाजता : नावनोंदणी<br>दु. २.०० वाजता : नियोजन बैठक | डॉ. वसंत खरात ९८५००६०६४५<br>डॉ. रोहित भडकवाड, ९९२२१८७७२९<br>डॉ. गणेश निमसे, ९४०४२८१८२८ |

सदर नियोजन बैठकीमध्ये उपस्थित राहणाऱ्या व उपरोक्त कालावधीमध्ये Online प्रस्ताव सादर करण्याऱ्या महाविद्यालयांनाच विशेष शिबिराचा प्रथम हप्ता देण्यात येणार आहे. महाविद्यालयांमार्फत शिबिर प्रस्ताव प्राप्त होणे गरजेचे असून त्याशिवाय महाविद्यालयांनी विशेष शिबिराचे आयोजन करू नये, तसेच महाविद्यालयांना शिबिराचा प्रथम हप्ता देता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

दत्तक गावाची निवड करताना शिबिरार्थी एकत्र किंवा टप्प्याटप्प्यात काम करतील आणि निवासस्थानी राहतील अशी व्यवस्था गावातील पदाधिकाऱ्यांशी बोलून त्याची शहानिशा करावी. केवळ राहण्या-खाण्याची सोय हाच एखाद्या गावाच्या निवडीचा निकष अजिबात असू नये असेही पुन्हा अधोरेखित करण्यात येत आहे. त्याऐवजी पुढील तीन ते पाच वर्षांमध्ये त्या गावात विविधांगी विकास व संरचनात्मक काम करणे शक्य व्हावे आणि अशा उपलब्धी व नैसर्गिक गरजा ज्या गावामध्ये निदर्शनास येतील त्याच गावाची संयोजक महाविद्यालयांनी निवड करावी. कळावे, ही विनंती.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**